REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 6 | MARCH - 2019

# नंदुरबार जिल्हयातील जमीन धारक व धारण केलेल्या जमिनीच्या क्षेत्रफळाचे मूल्यमापन

प्रा.डॉ.के.बी.गिरासे
सहयोगी प्राध्यापक , ग.तु.पाटील महाविद्यालय, नंदुरबार.

**सारांश :**



कृषी उत्पादनासाठी जमीन फार महत्वाची आहे मात्र काही वर्षापासुन हजारो जमीनीचे अकृषि जमिनीत रूपांतर होत आहे. जमिनीच्या खरेदी–विक्रीतुन आर्थिक हित व वाढते औद्योगिकरण यामुळे जमिनीचे क्षेत्रफळ कमी होत असून जमीन धारकांची संख्या मात्र वाढत आहे. या लेखात पुरूष व स्त्री जमीन धारक, त्यांनी धारण केलेले जमिनीच्या आकारानुसार क्षेत्रफळ व नंदुरबार जिल्हयातील असलेली एकूण जमिनीचे क्षेत्रफळ व जमीन धारकांची संख्या इ. घटकांचे जमिनीच्या आकारानुसार जमीन धारकांचे व क्षेत्रफळाचे वर्गीकरण करून मूल्यमापन करणे.

**प्रास्ताविक :**

नंदुरबार जिल्हयातील अक्राणी तळोदा व अक्कलकुवा तालुक्याचा काही प्रदेष सातपुडा पर्वतात असल्याने या तालुक्यात जमिनीचे क्षेत्र कृषीसाठी अल्प प्रमाणात उपलब्ध आहे. महाराष्ट्रातील मुंबई उपनगर व मुंबई वगळता राज्यातील 33 जिल्हयांमध्ये सर्वात कमी प्रमाणात धारकांच्या संख्येत नंदुरबार जिल्हयाचा शेवटून दूसरा क्रम आहे. म्हणजेच नंदुरबार जिल्हा 32 स्थानी आहे. जमीन धारकांनी धारण केलेल्या जमिनीच्या क्षेत्रफळाचा बाबतीत जिल्हयाचे 29 स्थानी आहे. नंदुरबार जिल्हयात लहान आकाराचे जमिनीचे क्षेत्रफळ असणारे जास्तीत जास्त जमीन धारक आहेत. जिल्हयात पाच हेक्टर व त्यापेक्षा कमी आकाराचे जमिनीचे क्षेत्रफळ धारण करणा–यांकडे जिल्हयातील एकूण धारण केलेल्या जमीनीच्या 82.73 टक्के जमिनीचे क्षेत्र यांनी धारण केलेले आहे. नंदुरबार जिल्हयातील तालुक्यानुसार जमीन धारकांनी संख्या व त्यांनी तालुक्यानुसार धारण केलेले जमिनीचे क्षेत्रफळ याची स्पष्ट कल्पना संशोधन निबंधातून प्रतिबिंबीत होईल. महाराष्ट्रात जमीन धारकांनी संख्या प्रत्येक कृषि गणना वर्षात 7446 जमीन धारकांच्या संख्येत वाढ झाली आहे तर 16828 हेक्टर जमिनीच्या क्षेत्रफळात वाढ झाली.

**बिजसंज्ञा :** जमीन धारक, पुरूष व स्त्री जमीन धारक, धारण जमीन, एकूण धारण जमीन.

**संशोधन पध्दती :**

संशोधन निबंध तयार करतांना भारताची कृषी गणना 2000–01 व 2010–11 आणि सरकारी नोंदीचा व संकेत स्थळांचा उपयोग करण्यात येईल. तसेच लेख, वर्तमानपत्रे आणि विषयाशी संबंधित पुस्तकांचाही दुय्यम माहितीसाठी उपयोग करण्यात येईल. त्याचप्रमाणे संशोधक स्वतः आकडेवारीचे वर्गीकरण आणि विश्लेषण करून कोष्टक तयार करेल. संदर्भ वर्ष म्हणून कृषी गणना 2010–11 व काही ठिकाणी कृषी गणना 2005–06 यांचा आधार घेईल. मुख्यत्वेकरून नंदुरबार जिल्हयातील जमीन धारकांची संख्या आणि त्यांनी धारण केलेल्या जमिनीच्या आकारानुसार क्षेत्रफळ व पाच हेक्टर व त्याखालील क्षेत्रफळ असणा–या जमीन धारकांची संख्या व त्यांनी धारण केलेले क्षेत्रफळ पुरूष व स्त्री जमीन धारक यांना वेगळे करून त्यांची संख्या व धारण केलेले

जमिनीचे क्षेत्रफळ अशा अनेक संबंधित घटकांवर प्रकाश टाकून त्याचे वर्गीकरण व विश्लेषण करून मूल्यमापन केले जाईल.

## निष्पती व चर्चा :

नंदुरबार जिल्हा हा एक आदिवासींची जास्त लोकसंख्या असलेला जिल्हा आहे. संशोधन निबंध हा नंदुरबार जिल्ह्यात उपलब्ध जमीन व या जमिनीचे लहान आकाराचे क्षेत्र जास्त प्रमाणात आहे. संशोधन निबंध हा नंदुरबार जिल्ह्यात उपलब्ध जमीन व या जमिनीचे पुरूष आणि स्त्री या दोहींकडे झालेले वाटप व त्याचप्रमाणे जिल्ह्यातील जमिनीच्या आकारानुसार जमीन धारकांनी संख्या तसेच जमीनीच्या आकारानुसार धारण केलेले जमिनीचे क्षेत्र आणि जिल्ह्यातील जमिनी बाबत सविस्तर आकडेवारी सारणीत दर्शवलेली आहे.

**सारणी क.1**

**नंदुरबार जिल्ह्यातील तालुकानुसार धारण करणा–यांची संख्या**

| जमीन क्षेत्राचा आकारा (हेक्टर) | अक्कलकुवा | अकानी | तळोदा | शहादा | नंदुरबार | नवापूर |
|---|---|---|---|---|---|---|
| 0.5 पेक्षा खाली | 1009 | 379 | 256 | 1860 | 2540 | 1249 |
| 0.5 ते 1.0 | 3226 | 1399 | 1956 | 7446 | 7749 | 6909 |
| 1.0 ते 2.0 | 5537 | 2961 | 5751 | 16473 | 15984 | 13423 |
| 2.0 ते 3.0 | 3235 | 1719 | 2447 | 6798 | 6890 | 5401 |
| 3.0 ते 4.0 | 1167 | 747 | 1102 | 3075 | 2610 | 1990 |
| 4.0 ते 5.0 | 727 | 378 | 507 | 1647 | 1460 | 1088 |
| 5.0 ते 10.0 | 963 | 536 | 532 | 1943 | 1932 | 1230 |
| 10.0 ते 20 | 126 | 83 | 29 | 211 | 199 | 139 |
| 20.0 आणि त्यापेक्षा जास्त | 13 | 5 | 3 | 46 | 24 | 13 |
| एकूण जमीन धारण करणाऱ्यांची संख्या | 16003 | 8207 | 12583 | 39499 | 39388 | 31442 |

**स्त्रोत – कृषी गणना 2010–11**

कृषी गणना 2010–11 नुसार नंदुरबार जिल्ह्यात एकूण 1,47,122 जमीन धारक असून सर्वात जास्त जमीन धारक (39,499) शहादा तालुक्यात आहेत. 2000–01 या वर्षी करण्यात आलेल्या कृषी गणनेनुसार जमीन धारकांनी एकूण संख्या (37,176) होती. 2010–11 मध्ये झालेल्या कृषी गणना दरम्यान (2,323) जमीन धारक समाविष्ट झाले. नंदुरबार तालुका जमीन धारकांच्या संख्येच्या बाबतीत दुसऱ्या कमांकावर होता. तालुक्यात (39,388) जमीन धारक असून 2000–01 मध्ये तालुक्यात (35,815) जमीन धारक होते. 2010–11 मध्ये त्यात (3,573) जमीन धारकांची वाढ झाली. नवापुर तालुक्यात 2000–01 झालेल्या कृषी गणनेनुसार (30,280) जमीन धारक होते. त्यात (1,162) जमीन धारकांची वाढ होवून 2010–11 मध्ये (31,442) जमीन धारकांची संख्या झाली. 2000–01 ते 2010–11 या दरम्यानच्या वर्षात तळोदा (11,616) वरून (12,583) व अक्राणी (7,511) वरून (8,207) तळोदा तालुक्यात (967) व अक्राणी तालुक्यात (696) जमीन धारकांमध्ये वाढ झाली. मात्र याच कालावधीत अक्कलकुवा तालुक्यात (17,278) वरून (16,003) जमीन धारकांची संख्या कमी झाली. ही घट (1,275) होती.

सारणी कमांक 2 मध्ये नंदुरबार जिल्ह्यातील तालुकानुसार जमीन धारकांनी जमिनीच्या क्षेत्राच्या आकारानुसार धारण केलेल्या जमिनीचे क्षेत्र दर्शविलेले आहे.

सारणी क.2

नंदुरबार जिल्ह्यातील तालुकानुसार धारण केलेल्या जमिनीचा क्षेत्राचा आकार (हेक्टर)

| जमीन क्षेत्राचा आकारा (हेक्टर) | अक्कलकुवा | अकानी | तळोदा | शहादा | नंदुरबार | नवापूर |
|---|---|---|---|---|---|---|
| 0.5 पेक्षा खाली | 364 | 153 | 92 | 616 | 754 | 506 |
| 0.5 ते 1.0 | 2404 | 1041 | 1536 | 5603 | 5898 | 5209 |
| 1.0 ते 2.0 | 7800 | 4280 | 8034 | 23605 | 22683 | 19046 |
| 2.0 ते 3.0 | 7414 | 4042 | 5653 | 16114 | 16325 | 12689 |
| 3.0 ते 4.0 | 4009 | 2573 | 3741 | 10562 | 8947 | 6804 |
| 4.0 ते 5.0 | 3222 | 1679 | 2234 | 7295 | 6475 | 4814 |
| 5.0 ते 10.0 | 6285 | 3527 | 3431 | 12564 | 12611 | 8012 |
| 10.0 ते 20 | 1562 | 1037 | 370 | 2646 | 2497 | 1712 |
| 20.0 आणि त्यापेक्षा जास्त | 597 | 107 | 70 | 2044 | 927 | 992 |
| एकूण जमीन धारण करणा—यांची संख्या | 33657 | 18439 | 25161 | 81048 | 77115 | 59784 |

**स्त्रोत – कृषी गणना 2010–11**

कृषी गणना 2010–11 प्रमाणे नंदुरबार जिल्ह्यात पुरूष 1,23,155 व स्त्री 23,574 असे एकत्रित 1,46,729 आणि संस्थात्मक 393 असे एकूण 1,47,122 जमीन धारक असून पुरूष जमीन धारकांनी 2,50,594 हेक्टर व स्त्री जमीन धारकांनी 42,448 हेक्टर व संस्थात्मक जमीन धारकांनी 2,162 हेक्टर जमीन धारण केलेली असून एकूण या सर्वांनी 2,95,204 हेक्टर जमीनीचे क्षेत्रफळ धारण केलेले आहे. नंदुरबार जिल्ह्यातील सर्वात जास्त जमितीचे क्षेत्र 81,048 हेक्टर शहादा तालुक्यात असून सरासरी 2.05 हेक्टर क्षेत्र जमीन धारकांकडे आहे. तालुक्यात 5 हेक्टर व त्यापेक्षा कमी जमिनीचे एकूण धारण क्षेत्र 63,795 असून या जमीन धारकांनी जवळ जवळ 78.71 टक्के जमीण धारण केलेली आहे. त्यानंतर नंदुरबार तालुक्यात 77,115 हेक्टर जमिनीचे क्षेत्र असून तालुक्यातील एकूण जममीन धारकांकडे सरासरी 1.96 हेक्टर क्षेत्र आहे. तालुक्यात 5 हेक्टर व त्यापेक्षा कमी जमीन धारण करणाऱ्यांकडे 61,081 हेक्टर जमीन असून या आकाराचे जमिनीचे क्षेत्र तालुक्यात 85.89 टक्के आहे. तृतीय स्थानी जास्त जमिनीचे क्षेत्र असलेला नवापुर तालुका असून तालुक्यात जमीन धारकांकडे 59,784 हेक्टर जमीन आहे. तालुक्यात जमीन धारकांकडे सरासरी 1.90 हेक्टर जमीन आहे. तालुक्यात 5 हेक्टर व त्यापेक्षा कमी जमीन धारण करणा—यांकडे 49,068 हेक्टर क्षेत्र असून तालुक्यातील एकूण जमीन धारण क्षेत्राचा 82.08 टक्के जमिनीचे क्षेत्र यांच्याकडे आहे. अक्कलकुवा तालुक्यात जमीन धारकांकडे 33,657 हेक्टर जमिनीचे क्षेत्र आहे. तालुक्यात सरासरी 2.10 हेक्टर जमिनीचे क्षेत्र येते. 5 हेक्टर व त्यापेक्षा कमी जमिनीचे एकूण धारण केलेले क्षेत्रफळ 25,213 असूण तालुक्यात 74.91 टक्के जमिनीचे क्षेत्र या आकाराच्या जीमण धारण करणा—यांकडे आहे. तळोदा तालुक्यात 25,161 हेक्टर जमीन धारण केलेली असून तालुक्यात जमीन धारकांकडे सरासरी 2.00 हेक्टर जमीन आहे. तर 5 हेक्टर व त्यापेक्षा कमी जमिनीचा आकार असलेले क्षेत्र धारण करणाऱ्यांकडे तालुक्यातील एकूण जमिनीपैकी 21,290 हेक्टर जमीन असून हे क्षेत्र एकूण तालुक्यातील जमिनीच्या 84.62 टक्के आहे. सर्वात कमी जमिनीचे क्षेत्रफळ अक्राणी तालुक्यात फक्त 18,439 हेक्टर असून तालुक्यात जमीन धारकांकडे सरासरी प्रत्येकी 2.25 हेक्टर जमीन आहे. 5 हेक्टर व त्यापेक्षा कमी आकाराचे जमिनीचे 74.67 टक्के आहे. नंदुरबार जिल्ह्यात अक्राणी तालुक्याचा प्रदेष सातपुडा पर्वतात येत असल्याने जमिनीचे क्षेत्र इतर तालुक्यांपेक्षा कमी आहे. तळोदा व अक्कलकुवा तालुक्यांचाही काही प्रदेश सातपुडयात असल्याने तुलनात्मक कमी आहे.

सारणी कमांक 3 मध्ये नंदुरबार जिल्ह्यातील क्षेत्रफळानुसार जमीन धारकांची संख्या, धारण केलेली जमीन, एकूण जमीन धारक व एकूण धारण क्षेत्रफळ दर्शविलेली आहे.

## सारणी क.3
## नंदुरबार जिल्ह्यातील क्षेत्रफळानुसार जमीन धारकांची संख्या, धारण केलेल्या जमिन एकूण धारण क्षेत्रफळ

| जमीन क्षेत्राचा आकार (हेक्टर) | जमिनीचे क्षेत्रफळानुसार धारण करणाऱ्यांची संख्या | | धारण केलेली जमिन (हेक्टर) | | एकूण जमीन धारकांची संख्या | एकूण धारण केलेले जमिनीचे क्षेत्रफळ (हेक्टर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री | पुरुष व स्त्री | पुरुष व स्त्री |
| 0.5 पेक्षा खाली | 6,031 | 1,258 | 2,020 | 463 | 7,289 | 2,483 |
| 0.5 ते 1.0 | 23,743 | 4,899 | 17,960 | 3,698 | 28,642 | 21,658 |
| 1.0 ते 2.0 | 49,688 | 10,276 | 70,651 | 14,559 | 59,964 | 85,210 |
| 2.0 ते 3.0 | 22,358 | 4,068 | 52,539 | 9,545 | 26,426 | 62,084 |
| 3.0 ते 4.0 | 9,147 | 1,509 | 31,358 | 5,160 | 10,656 | 36,518 |
| 4.0 ते 5.0 | 5,077 | 717 | 22,484 | 3,179 | 5,794 | 25,663 |
| 5.0 ते 10.0 | 6,312 | 791 | 41,169 | 5,031 | 7,103 | 46,200 |
| 10.0 ते 20 | 723 | 49 | 9,004 | 605 | 772 | 9,609 |
| 20.0 आणि त्यापेक्षा जास्त | 76 | 7 | 3,409 | 208 | 63 | 3,617 |
| एकूण | 1,23,155 | 23,574 | 2,50,594 | 42,448 | 1,46,729 | 2,93,042 |

**नंदुरबार जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन 2011–12.**

सारणी क्रमांक 3 वरुन असे निदर्शनास येते की, जिल्ह्यात पाच हेक्टर व त्यापेक्षा खालील जमिनीचे क्षेत्र धारण करणारे पुरुष 1,23,155 व स्त्रीया 22,727 असून एक्त्रित 1,38,771 जमीन धारक आहेत. धारण केलेल्या जमिनीच्या क्षेत्रफळानुसार पुरुष जमीन धारकांची टक्केवारी विचारात घेता 5 हेक्टर व त्या खालील क्षेत्र असलेले (94.23) टक्के असून स्त्री (96..41) टक्के आहेत. तर पुरुष व स्त्री मिळून एकत्रित (94.58) टक्के आहेत.

पाच हेक्टर व त्यापेक्षा खालील पुरुष जमीन धारकांची जमिनीचा आकार वर्गानुसार पाहता 0.5 हेक्टर पेक्षा खालील जमीन धारकांची संख्या (5.20) टक्के असून 0.5 ते 1.0 हेक्टर (20.46), 1.0 ते 2.0 हेक्टर (42.82) 2.0 ते 3.0 हेक्टर (19.27), 3.0 ते 4 हेक्टर (7.88) व 4.0 ते 5.0 हेक्टर (4.38) टक्के जमीन धारक आहेत. स्त्री जमीन धारकांची टक्केवारी 0.5 हेक्टर पेक्षा कमी जमीन धारण करणाऱ्या (5.54) टक्के आहेत. तर अनुक्रमे 0.5 ते 1.0 हेक्टर (21.56), 1.0 ते 2.0 हेक्टर (45.21), 2.0 ते 3.0 हेक्टर (17.90), 3.0 ते 4.0 हेक्टर (6.64) व 4.0 ते 5. 0 हेक्टर (3.15) टक्के स्त्री जमीन धारकांची संख्या आहे. पुरुष व स्त्री एकत्रित जमीन धारकांची संख्या टक्केवारीत विचारात घेता 0.5 हेक्टर पेक्षा खालील (5.25) टक्के जमीन धारक आहेत तर अनुक्रमे 0.5 ते 1.0 हेक्टर (20.64), 1.0 ते 2.0 (43.21), 2.0 ते 3.0 हेक्टर (19.04), 3.0 ते 4.0 हेक्टर (7.68) व 4.0 ते 5.0 हेक्टर (4. 18) टक्के एकूण जमीन धारक आहेत.

जिल्ह्यात 5.0 ते 10 हेक्टर पुरुष धारक (5.13) आहेत. तर स्त्री (3.36) टक्के आहेत. तसेच 10.0 ते 20 हेक्टर पुरुष (0.59) टक्के व स्त्री (0.21) टक्के असून 20.0 हेक्टर व त्यापेक्षा जास्त जमिनीचा आकार असणारे पुरुष (0.06) व स्त्री (0.03) टक्के आहेत. पुरुष व स्त्री एकत्रित जमीन धारकांची जमिनीच्या आकारानुसार संख्या अनुक्रमे 5.0 ते 10.0 हेक्टर (4.84) टक्के 10.0 ते 20.0 हेक्टर (0.53) व 20.0 हेक्टर व त्यापेक्षा जास्त जमीन धारक (0.06) 5 हेक्टर व त्यापेक्षा जास्त आकाराचे जमिनीचे क्षेत्र धारण करणारे पुरुष (5.78) टक्के असून स्त्रिया (3.6) टक्के आहेत. 5.0 हेक्टर व त्यापेक्षा जास्त आकाराचे जमिनीचे क्षेत्र धारण करणाऱ्यांची संख्या पुरुष व स्त्रिया एकत्रित (5.43) टक्के आहेत.

सारणीवरुन असे निदर्शनास येते की, नंदुरबार जिल्ह्यात 5 हेक्टर व त्यापेक्षा खालील आकाराचे पुरुषांनी धारण केलेल्या एकूण जमिनीच्या क्षेत्रफळाच्या (78.62) टक्के व स्त्री जमीन धारकांनी धारण केलेल्या एकूण जमिनीच्या क्षेत्रफळाच्या (86.23) टक्के जमिनीचे क्षेत्रफळ धारण केलेले आहे. 5 हेक्टर व त्यापेक्षा खालील

जमिनीचे क्षेत्रफळ धारण करणा—या पुरुष जमीन धारकांकडे अनुक्रमे 0.5 हेक्टर पेक्षा कमी (1.03) टक्के, 0.5 ते 1.0 हेक्टर (9.12), 1.0 ते 2.0 हेक्टर (35.86), 2.0 ते 3.0 हेक्टर (26.67), 2.0 ते 3.0 हेक्टर (26.67), 3.0 ते 4.0 हेक्टर (15.92) व 4.0 ते 5.0 हेक्टर (11.41) टक्के जमिनीचे क्षेत्रफळ आहे. 5 हेक्टर पेक्षा जास्त पुरुष जमीन धारकांनी धारण केलेली जमिनीच्या क्षेत्रफळाची टक्केवारी पाहता अनुक्रमे 0.5 ते 1.0 हेक्टर (16.43) 10.0 ते 20.0 हेक्टर (3.59) व 20.0 हेक्टर व त्यापेक्षा जास्त पुरुष जमीन धारकांडे (1.36) टक्के जमीन आहे. स्त्री जमीन धारकांनी एकूण धारण केलेल्या जमिनीच्या क्षेत्रफळाच्या आकारानुसार वर्गीकरण केले तर अनुक्रमे 0.5 हेक्टर पेक्षा कमी आकाराचे क्षेत्रफळ धारण करणाऱ्या स्त्रियांनी (1.26) टक्के क्षेत्रफळ धारण केलेले होते. तसेच अनुक्रमे 0.5 ते 1.0 हेक्टर (10.10), 1.0 ते 2.0 हेक्टर (39.77), 2.0 ते 3.0 हेक्टर (26.08), 3.0 ते 4.0 हेक्टर (14.10) व 4.0 ते 5.0 हेक्टर (8.68) टक्के जमीन धारण केलेली होती. तसेच 5.0 ते 10.0 हेक्टर (11.85) 10.0 ते 20.0 हेक्टर (1.43) व 20.0 हेक्टर व त्यापेक्षा जास्त (0.49) टक्के स्त्री जमीन धारकांनी जमीन धारण केलेली होती.

## निष्कर्ष :

1) महाराष्ट्रातील जिल्ह्यांमध्ये नंदुरबार जिल्ह्यात जमीन धारकांची संख्या कमी दिसून येते. गडचिरोली जिल्ह्यानंतर नंदुरबार जिल्हा जमीन धारकांच्या कमी संख्या असणारा शेवटून दुसऱ्या स्थानी आहे.

2) नंदुरबार जिल्ह्यात महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांच्या तुलनेत अल्प जमीन उपलब्ध असून जिल्ह्याने धारण केलेली जमीन पाहता 29 स्थानी आहे. जिल्ह्यातील बरीचशी जमीन सातपुडा पर्वतात समाविष्ट असल्यामुळे जमिनीचे क्षेत्रफळ जमीन धारकांसाठी कमी प्रमाणात उपलब्ध आहे.

3) जिल्ह्यात पाच हेक्टर व त्यापेक्षा कमी जमीन धारण करणाऱ्यांची संख्या 94.54 टक्के आहे यावरुन निदर्शनास येते की, जिल्ह्यात कमी आकाराचे जमिनीचे क्षेत्र जमीन धारकांकडे आहे.

4) 2000—01 ते 2010—11 या कृषी गणना कालावधी दरम्यान जिल्ह्यातील जमीन धारकांची संख्येत वाढ झाली व जमिनीच्या क्षेत्रफळातही वाढ झाली जमीन धारक व जमिनीचे क्षेत्रफळ यातील वाढ पाहता प्रत्येक जमीन धारकास सरासरी 2.26 हेक्टर जमिनीचे क्षेत्रफळ वाढ झालेले होते. जिल्ह्यात ही एक समाधान कारक बाब म्हणता येईल.

5) पुरुष जमीन धारकांमध्ये 2000—01 ते 2010—11 या दरम्यान 5.73 टक्के वाढ झाली तर जमिनीच्या क्षेत्रफळात 7.60 टक्के वाढ झाली वाढ झालेल्या जमीन धारकांकडे वाढ झालेले जमिनीचे क्षेत्रफळ सरासरी 2.65 हेक्टर होते.

6) स्त्री जमीन धारकांच्या संख्येत मागील दहा वर्षात 3.12 टक्के वाढ झाली. मात्र जमिनीच्या क्षेत्रफळात दहा वर्षाच्या दरम्यान 2.75 घट झाली. यावरुन सांगता येईल की, स्त्री जमीन धारकांकडे जमिनीचे क्षेत्र कमी झालेले आहे.

7) जिल्ह्यात 1.0 ते 2.0 हेक्टर जमीन धारकांची जवळ जवळ पन्नास टक्के संख्या आहे. यावरुन जिल्ह्यातील जमीन धारकांकडे असलेल्या जमिनीचे तुकडीकरण झालेले आहे.

8) जिल्ह्यातील जमीन धारकांकडे सरासरी फक्त 2.0 हेक्टर जमिनीचे क्षेत्र आहे.

## संदर्भ :

1) Agriculture Census of India, 2000-01 and 2010-11
2) Agriculture Census of Maharashtra, 2000-01 and 2010-11
3) Agriculture Statistics at glance 2012, Directorate of Economics and Statistics.
4) Geography of Maharashtra – Dr.S.M.Bhamare, Prashant Publication, Jalgaon.
5) Report of Agriculture Census, 2000-01, Maharashtra State Department of Agriculture.
6) कृषीशास्त्र आणि कृषी विकास — रंजन कोळंबे, भागीरथ प्रकाशन, पुणे.
7) महाराष्ट्राची संक्षिप्त सांख्यिकी, 2012 — अर्थ व सांख्यिकी संचालनालय महाराष्ट्र शासन.
8) agcensus.dacnet.nic.in
9) नंदुरबार जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन 2011—12.